● गुरुवार, दि. २३ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १७५ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### खासदार डॉ. कल्याण काळे यांनी घेतली आयसीटी कॉलेजची आढावा बैठक

## जालन्यातील प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजनेच्या सूचना; निधी उपलब्ध करुन देणार - डॉ. कल्याण काळे

**जालना । प्रतिनिधी -** शहरात होत असलेलेल प्रदूषण हे गंभीर असून प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना देतांनाच त्यासाठी प्रोजेक्ट तयार करा यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन डॉ. कल्याण काळे यांनी येथे दिले.

शहरात सुरु असलेल्या आयसीटी कॉलेज प्रशासनाची खा. डॉ. कल्याण काळे यांनी बुधवार (दि. २२) रोजी बैठक घेत कॉलेजच्या प्रगतीचा आढावा घेतला. दरम्यान, कॉलेजच्या विविध लॅबची पाहणी करुन कॉलेजचे कामकाज समजावून घेतले. यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल, आयसीटीचे डायरेक्टर शशांक म्हस्के, डेप्युटी डायरेक्टर डॉ. पराग नेमाडे, डॉ. मनोज गावडे, प्रा. गिरीश जोशी, प्रा. राहुल व्यास, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, नंदु जांगडे, माजी जि. प. सभापती जयप्रकाश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

जालना शहरातील प्रदुषण कमी करण्यासाठी उपाय योजना करावयात आणि मोसंबी प्रक्रिया करुन ज्युस जास्त काळ टिकविण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यासाठीचे प्रोजेक्ट सादर करावेत अशा सूचना खा. डॉ. कल्याण काळे यांनी कॉलेज व्यवस्थापनाला दिल्यात. हा खर्च उभा करुन जालना शहरातील प्रदुषण कमी करण्यात येईल. जमशेदपूर येथे ज्या पध्दतीने प्रदुषणावर नियंत्रण आहे, अगदी तसेच नियंत्रण जालना शहरातील प्रदुषणावर मिळविण्यात येईल अशीही चर्चा या बैठकीत करण्यात आली. या प्रोजेक्टसाठी जो काही खर्च येईत तो उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटले.



जालना शहरात सन २०१८ मध्ये मंजुर असलेल्या आयसीटी कॉलेजमध्ये सध्या ४५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. भुवनेश्वर आणि जालना येथे एकाच वेळी आयसीटी कॉलेजला मंजुरी मिळाली होती. जालना शहरात हे कॉलेज सुरु असल्याने जालन्यासाठी आणि जालना जिल्ह्यातील जनतेसाठी कॉलेजने काही तरी चांगले काम केले पाहिजे. जालना शहरातील प्रदूषणासाठी उद्योजकांना दोष देऊन उपयोग नाही, तर प्रदुषण नियंत्रणासाठी आयसीटीने काहीतरी उपाय केला पाहिजे. त्यासाठी लागणारा निधी कमी पडू दिला जाणार नाही. असेही खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटलंय. बैठकी दरम्यान कॉलेजची चांगली प्रगती असून या कॉलेजचे २० विद्यार्थी हे विदेशातही फेलोशिक घेऊन उच्च शिक्षण घेत आहेत. सदरील कॉलेज हे भाड्याच्या इमारतीत पान २ वर

## आग लागल्याच्या भीतीने प्रवाशांच्या ट्रेनमधून उड्या; ११ प्रवाशांचा मृत्यू

**जळगाव -** जळगावमध्ये रेल्वेने काही प्रवाशांना उडावल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुष्पक एक्स्प्रेसमध्ये प्रवास करणाऱ्या काही प्रवाशांनी आग लागल्याची भीतीने ट्रेनमधून खाली उड्या मारल्या. मात्र याच वेळी समोरुन येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने या प्रवाशांना उडवलं. यामध्ये ११ प्रवाशांची मृत्यू झाल्याची माहिती जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली आहे. या दुर्घटनेची माहिती समोर आल्यानंतर तात्काळ मदतकार्यक केले जात आहे.

गुलाबराव पाटील यांनी सांगितलं की कर्नाटक एक्सप्रेसने उडवल्याने ११ लोकांचा मृत्यू झाला आहे. ज्यापैकी चार जणांचे मृतदेह पाचोरा येथे आहेत. तर आठ मृतदेह हे जळगावला पाठवण्यात आले आहेत. तसेच चार लोक गंभीर जखमी आहेत, त्यांना वृंदावन या खाजगी रुग्णालयात उपचार केले जात आहेत. ७ जणांना किरकोळ जखमा झाल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात जळगाव- मुंबई रेल्वे मार्गावर माहिजी आणि पारधाडे स्थानकादरम्यान ही भीषण दुर्घटना घडली आहे.

परधाडे गावाजवळ ही घटना घडली आहे. रेल्वे रुळ ओलांडताना ही दुर्घटना घडल्याचे काही लोकांचे म्हणणे आहे. तर काही लोकांचे म्हणणे आहे की आग लागल्याच्या अफवेने लोकांनी उड्या मारल्या. १५ ते २० मिनिटात प्रांत अधिकारी आणि कलेक्टर घटनास्थळी पोहचत आहेत. घटनास्थळी पोहचायला जळगावहून ३० ते ४० मिनिटं लागतात. पण जोपर्यंत इथं कोणी जाणार नाही तोपर्यंत हे लक्षात येणार नाही, अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी टीव्ही९ शी बोलताना दिली.

या दुर्घटनेबद्दल जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी माहिती देताना सांगितले की, मध्य पान २ वर

### परभणी ते मुंबई मंत्रालय लॉन्ग मार्च मंठ्यात

## न्याय मिळणार नाही तोपर्यंत लढा सुरुच राहणार



**मंठा । प्रतिनिधी -** परभणी ते मुंबई मंत्रालय येथे जात असलेला लॉन्ग मार्च सोमवार (दि २१) मंठ्यात धडकला होता. या मार्चचे नेतृत्त्व आशिष वाकोडे तसेच अविनाश सुर्यवंशी मार्गदर्शक आहेत.

शहिद विजय वाकोडे, शहीद सोमनाथ सुर्यवंशी व स्व. संतोष (अण्णा) देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी लाखोंच्या संख्येने लाँगमार्च मंठा येथे विठ्ठल मंगल कार्यालयात आलेला असतांना पत्रकार परिषद बोलतांना मार्गदर्शन समाज भूषण भीमराव हत्तीअंबीरे म्हणाले की, पाशवी बहुमत मिळालेल्या सरकारला जनतेचा आवाज ऐकायचा नाही. जनतेचे नेतृत्व करणारे विजय वाकोडे, सोमनाथ सूर्यवंशी, मस्साजोगचे सरपंच संतोष (अण्णा) देशमुख यांच्या बद्दल सरकारला काही देणे घेणे नाही. पोलिसांना माणूस म्हणायचे का? जल्हाद कॉम्बिंग ऑपरेशन हे अमानवीय असंविधानिक होते. पुढील पाच वर्षांमध्ये आंबेडकरी समाज, मुस्लिम समाज,अल्पसंख्यांकावर अन्याय अत्याचार होतच राहणार उद्या सोमनाथ सूर्यवंशी होऊ नये, संतोष अण्णा देशमुख होऊ नये यासाठी हा लाँग मार्च असून जोपर्यंत सरकार या तिघांना न्याय देणार नाही, तोपर्यंत आम्ही पुढे मुंबईकडे जाण्याचा प्रयत्न करणार आहोत. यावेळी रमेश खरात अॅड. अनिल मोरे, अप्पासाहेब सदावर्ते, प्रकाश अण्णा घुले, प्रा. डॉ.राजेश गायकवाड, प्रा. डॉ. दीपाली गायकवाड, अॅड. सुमेध आवारे, जिजाभाऊ देशमाने, अहिंसक वाघमारे, प्रदीप डावरे, सुनील आवचार, गौतम सदावर्ते, सरपंच,डॉ. शेषराव काऊतकर, भागवत पंडित, इंजि.राहुल वानखेडे, संजय गोंडगे, संदीप मुळे, स्वप्निल गोंडगे, अरुण अण्णा प्रधान, विलास बापू मोरे, महादेव सूर्यवंशी सरपंच, अजय गायकवाड, समाधान आघाम, सुदेश अंभोरे, प्रकाश मगर, डॉअविनाश प्रधान, डॉ. धोंडोपंत मानवतकर, अशोक जावळे, दीपक अवचार, राहुल वाघमारे, जगदीश मोरे, रवी त्र्यंबक वाघमारे, सविता विश्वनाथ वाटुरे, दतराव चोरमारे, रामेश्वर कामटे, संदेश मोरे, प्रमिला अशोक आघाम, रोहिदास महादू मस्के, भारत खंदारे, मारोती नाठभांज, कुंदन मोरे, प्रा.रा.घो. गायकवाड, अविनाश वाघमारे पी.बी.हिवाळे, स्वप्निल प्रधान, प्रशांत अवचार, करण वटाणे, स्वप्निल खंदारे, दादाराव हिवाळे, अक्षयदीप वाघमारे, सौरभ मोरे, धम्मानंद वाघमारे, अरुण वाघमारे, प्रो सोनाजी कामिटे, संजय शेजुळ, स्वप्निल शिवाजी प्रधान, कुलदिप मनोहर वाघमारे, आनंद ढवळे, आप्पासाहेब गवळी, विलास काऊतकर, इंजि. सुरेश येडेकर, मारुती खनपटे, बाबासाहेब इंगळे, साईनाथ मोरे, पवन मोरे, भगवान चव्हाण, अंकुश देशमाने, विकास सर्जेराव वाघमारे, कपिल वाघमारे, रवी वाघमारे, भिमराव खरात, दिनकर सदर, सावरगाव वायाळ, प्रा.संतोष रंजवे, आकाश भगवान मोरे, प्रकाश लहाने, राहुल खरात, प्रदीप चव्हाण, जयभीम रंधे, आकाश निवृत्ती इंगळे, भीमराव खरात, प्रदीप उघडे, प्रकाश वाव्हाले, भगवान वाघ, शुभम अंभोरे, विशाल खंदारे, आदित्य सदावर्ते यांनी श्रम घेतले.

जोपर्यंत आम्हाला न्याय मिळत नाही आम्ही आंदोलन करणार माझ्या भावाचे स्वप्न तोडण्याचे काम प्रशासनाने केले आमच्या आधार कुटुंबाचा प्रमुख माझ्या भावाचे स्वप्न पोलीस प्रशासनाने तोडली आम्हाला काय करावे काय नाही हे सुचत नाहीसोमनाथ सूर्यवंशी यांचा भाऊ अविनाश सूर्यवंशी लोकनेते विजय वाकोडे यांनी अतिशय शांतपणे आंदोलन हाताळत असताना माकड टोप्या घालून रुमाल बांधून परभणी बाजारपेठेत घुसून काही समाजकंटकांनी केली. यामध्ये ३२ मुलं ज्यांचं दंगलीचे संबंधही नाही अशा मुलांमध्ये सोमनाथ यांना उचलले गेले. त्यांना जबर मारहाण केली. यात सोमनाथ यांचा मृत्यू झाला. पीएम अहवाला मध्ये स्पष्ट दिले आहे की, मल्टिपल इंजर्ड सोमनाथ यांचा जीव गमवावा लागला. महिन्याभरापासून आम्ही आंदोलन करत आहोत परंतु आम्हाला न्याय प्राप्त होत नसून म्हणून न्याय हक्कासाठी परभणी ते मुंबई हा लाँग मार्च काढला असल्याचे उपस्थितांनी सांगितले आहे.

## 'त्या' खून प्रकरणात आरोपीस जन्मठेप; ५ हजारांचा दंड

### जिल्हा आणि सत्र न्यायालयाचा निकाल

**जालना । प्रतिनिधी -** घरमालकीणीचा खून करून स्वतः आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला जालना जिल्हा आणि सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा आणि ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.भीमराव धांडे असं न्यायालयाने शिक्षा सुनावलेल्या आरोपीचं नाव आहे.विशेष सरकारी वकील अँड उज्वल निकम यांनी या खटल्यात पक्षकाराच्या बाजूने न्यायालयात बाजू मांडली.



मालक आणि मालकिणीसोबत वाद झाल्याने भीमा धांडे या नोकराने स्वयंपाकघरातील धारदार चाकूने वार करत घरमालकीण संगीता लाहोटी यांचा खून केला होता. यानंतर स्वतः विष प्राशन करत आत्महत्येचा प्रयत्न केला होता. ही घटना जालना शहरातील पोस्ट ऑफिस रोडवर १५ डिसेंबर २०२१ रोजी घडली होती. त्यांनंतर आरोपी धांडे याला पोलिसांनी अटक केली होती. न्यायालयात हे प्रकरण अंतरिम सुनावणीसाठी ठेवण्यात आलं होतं.अखेर आज जिल्हा आणि सत्र न्यायालयाने या प्रकरणात निकाल दिला असून आरोपी भीमराव धांडे याला जन्मठेपेची शिक्षा आणि ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

## मंठा तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक

मंठा । प्रतिनिधी - शिवसेनेचे नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिदे हे येत्या २५ जानेवारी रोजी जालना दौऱ्यावर येत असून या संदर्भात पूर्व नियोजनासाठी शिवसेना प्रमुख पदाधिकाऱ्यांची बुधवार (दि २२) मंठा येथे शिवसेना संपर्क कार्यालय प्रल्हादराव बोराडे कॉम्प्लेक्स येथे बैठक घेण्यात आली यावेळी या बैठकीला संबोधित करताना शिवसेना उपनेते मुंबई आनंदराव जाधव साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब जी घुगे, शिवसेना नेते मोहनजी अग्रवाल, संपर्क नेते विलास जी पारकर साहेब, संपर्क नेते राजेश जी मोरे साहेब, महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंदाताई शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख उदय दादा बोराडे, परतुर तालुका प्रमुख अमोल सुरंग, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सुनीता देशमुख, संगीता खराबे, सविता गवळी, तांबे ताई, मीरा सरकटे, बाबासाहेब चिखले, विलासराव शिंदे, योगेशराव गणगे, शिवाजी तरवटे, विजयकुमार गिरी, दीपक हिवाळे, दिलीपराव हिवाळे, विलासराव राठोड, नितीन मोरे, रामराव वरकड, सतीश देशमुख, बाळासाहेब देशमुख, भीमराव वाघ, पांडुरंग बोराडे, अमोल विरकर, दत्तात्रय बोराडे, दिपक गायकवाड, विजय चव्हाण, राजेश खरात, विनोद प्रधान, माऊली वायाळ ,संतोष देवकर,पिराजी पवळे, विलास बनसोडे, पान २ वर



## जेथे चांगली गोसेवा होते ते ठिकाण वृंदावन बनते –राधाकृष्णजी महाराज

**जालना । प्रतिनिधी -** आपल्या घराच्या आजूबाजूला मोकळी जागा असेल तर तेथे गाय पाळा आणि सेवा करा. घर वृंदावन बनल्याशिवाय राहणार नाही. जिथे गोप- गोपी-गाईची सेवा चांगल्या प्रकारे होते ते ठिकाण वृंदावन बनते. जालना शहरातही अनेक गोशाळा आहेत. तेथील गोमाता सुखी तर जालनानगरी वृंदावन आहे. मात्र, जेथे गाय सुखी नाही ते वृंदावनदेखील वृंदावन नाही. त्यामुळे घर, गाव, शहर वृंदावन करायचे असेल तर गोसेवेला प्राथमिकता द्या, असा मौलिक सल्ला गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांनी येथे बोलताना दिला.



श्रीमद् भागवत कथा सेवा समिती आणि सनातन हिंदू समाज यांच्यावतीने जालना शहरातील भोकरदन रोडवरील ब्रजधाममध्ये आयोजित श्रीमद् भागवत कथेच्या आज बुधवारी (ता. २२) पाचव्या दिवशी नंदोत्सव, कृष्णलीला, भगवान कृष्णाचे गोपालन या अनुषंगाने राधाकृष्णजी महाराज यांनी गोपालनाचे महत्त्व विशद केले. यावेळी प. पू. महामंडलेश्वर गिरी महाराज, वेणुनाथ महाराज, महाराष्ट्रभर गोमहिमा मांडणारे राष्ट्रीय कीर्तनकार संजय महाराज पाचपोर, राघोजी महाराज, ज्ञानेश महाराज उपस्थित होते.

मानवी जीवाचे महात्म वाढवण्यासाठी भगवान अवतार घेतात. लीला करतात. या लीला आपल्याला युगानूयुगाची खुशी देऊन जातात. कृष्णाने गोसेवा, गोपालन व संवर्धन केले. गोसेवेतून गोमातेचे महात्म वाढविले. मानव ईश्वरी कार्याचे अनुकरण करतो. कृष्णाला गोमाता प्रिय होती म्हणून आपण गोसेवा करतो. सन २००८-२००९ मध्ये सर्वत्र दुष्काळी परिस्थिती होती. तेव्हा पथमेडा गोधामच्या ट्रस्टींकडून मिळालेल्या प्रेरणेमुळे वर्षभर गोमातेसाठी कथा करण्याची संधी मिळाली. त्यातून आत्मिक समाधान लाभल्याचे सांगून, राधाकृष्णजी महाराज यांनी वात्सल्याची परिभाषा विषद केली. सदैव करुणामध्ये राहणारा एक गुण आणि स्वभाव म्हणजे वात्सल्य होय. भक्तांनी सदैव वात्सल्यामध्ये राहायला हवे. ईश्वर सेवेनंतर वैमनस्याची भावना उत्पन्न होणे, दुसऱ्यांबद्दल वाईट चिंतनारा भक्त असू शकत नाही. ईश्वर सेवेत हृदयात प्रेम आणि वात्सल्य असावे. लहान मुलांवर प्रेम, वृद्धांची सेवा हीदेखील कृष्ण भक्ती आहे. घरात पुत्र जन्माला आल्यानंतर कुटुंबात मोठा आनंद साजरा केला जातो. कृष्णजन्म आनंदाची निर्मिती ठरली. आपल्या जन्मामुळे आपल्या किती आनंद झाला यापेक्षा इतरांना किती आनंद मिळाला, याला विशेष महत्त्व आहे. आज आपण देवदर्शन आणि तीर्थाटन लाभासाठी करतो. देवाला काहीतरी मागण्यासाठी जातो. हे एक प्रकारचे पर्यटन आहे. अशी भक्ती काही कामाची नाही. हल्ली गावा-गावात नवीन मंदिरे उभारण्यावर भर दिला जात आहे. वास्तविक पाहता अस्तित्वात असलेल्या पुरातन पान २ वर

## संपादकीय

### मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब



हिंदू हृदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची ९९ वि जयंती. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या जयंती दिनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

---

प्रयागराज कुंभमध्ये हिंदु जनजागृती समितीची 'हिंदू एकदा पदयात्रा'!

# कुंभमेळ्यामध्ये घुमला 'हिंदु राष्ट्रा'चा जयघोष !

**प्रयागराज -** अयोध्या येथे भव्य श्रीराम मंदिरात श्रीरामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेला २२ जानेवारी २०२५ रोजी एक वर्ष पूर्ण झाले आहे. या शुभप्रसंगी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने कुंभक्षेत्रात भव्य 'हिंदु एकता पदयात्रा' काढण्यात आली. महाकुंभ क्षेत्रातून विश्वकल्याणकारी रामराज्य अर्थात् हिंदु राष्ट्र स्थापनेचा आवाज बुलंद करण्यासाठी या पदयात्रेद्वारे संदेश देण्यात आला. या पदयात्रेत हिंदु राष्ट्र स्थापनेचे प्रेरणास्त्रोत आणि सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ तथा श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, आणि हिंदु जनजागृती समितीचे उत्तर-पूर्व भारताचे मार्गदर्शक सद्गुरु नीलेश सिंगबाळ यांची वंदनीय उपस्थिती होती. तसेच आध्यात्मिक संस्था, हिंदू संघटना, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे अधिवक्ता, हिंदुत्वनिष्ठ आणि भाविक सहभागी मोठ्या संख्येने झाले होते.

ही पदयात्रा प्रयागराज कुंभक्षेत्रातील मुक्ती-मोरी मार्ग चौक, सेक्टर १९ येथून चालू झाली. तेथून संगम लोव्हर, काली रस्ता येथून पुन्हा मोरी मुक्ती मार्गाने सेक्टर १९ (कुंभक्षेत्र) येथे येऊन तिचे समापन झाले. या वेळी सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस, हिंदु जनजागृती समितीचे समन्वयक श्री. सुनील घनवट आणि हिंदु जनजागृती समितीचे उत्तर प्रदेश तथा बिहार समन्वयक श्री. विश्वनाथ कुलकर्णी हे सहभागी झाले होते.

भगवे कपडे आणि ध्वज यांमुळे कुंभक्षेत्राचा परिसर भगवामय झाला ! : हिंदु राष्ट्राचे प्रेरणास्थान सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांची फुलांनी सजवलेली प्रतिमा वाहनावर लावण्यात आली होती. पदयात्रेत संत, महंत, हिंदुत्वनिष्ठ, धर्मप्रेमी यांनी भगवे वस्त्र आणि ध्वज हातात घेतले होते. त्यामुळे कुंभक्षेत्रातील संपूर्ण परिसर भगवेमय झाले होते. या वेळी 'जय श्रीराम, हिंदु राष्ट्राचा विजय असो', 'लाना होगा लाना होगा हिंदु राष्ट्र लाना होगा', 'जो हिंदु हित का काम करेगा वही देशपर राज करेगा', 'हर हर महादेव, गंगामाता की जय हो', अशा दिलेल्या घोषणांनी कुंभक्षेत्राचा परिसर दणाणून गेला. हिंदु राष्ट्र स्थापना करण्याची संत-महंत व हिंदुत्वनिष्ठ यांनी पदयात्रेत गर्जना केली.




या वेळी हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे म्हणाले की, हिंदु धर्म 'वसुधैव कुटुंबकम्'ची शिकवण देतो. अशा धर्माला संविधानाद्वारे अधिकृत संरक्षण मिळण्यासाठी भारताला हिंदु राष्ट्र घोषित करणे आवश्यक आहे. ही मागणी विश्वकल्याणासाठी कार्यरत असलेल्या हिंदु संस्कृतीला जिवंत ठेवण्यासाठी आहे. महाकुंभक्षेत्राकडे पूर्ण जगाचे लक्ष आहे. त्यामुळे या पदयात्रेच्या माध्यमातून हिंदु संत, महंत, देश-विदेशातील हिंदु समाज यांच्या मनातील हिंदु राष्ट्राची मागणी आम्ही सरकारपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करत आहोत. संतांच्या सान्निध्यात कुंभसारख्या महत्त्वपूर्ण पर्वावर प्रयागराजसारख्या धार्मिक नगरीत केलेली हिंदु राष्ट्राची मागणी लवकरच फलद्रुप होईल, अशी आमची श्रद्धा आहे. या वेळी 'विश्वकल्याणासाठी भारतात हिंदु राष्ट्राची स्थापना व्हावी', यासाठी पदयात्रेच्या शेवटी कुंभस्थित देवता आणि ऋषीमुनी यांच्या चरणी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

---

# कोट्यवधी हिंदूंचे दैवत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे



हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे म्हणजे ज्वलंत हिंदुत्वाचा धगधगता अंगार. हिंदुत्वाचा स्वाभिमान सदैव जागृत ठेवणारा स्फुर्तीचा जिवंत झरा. बाळासाहेब हे झुंजार होते, रसिक होते आणि मुख्य म्हणजे ते एका मोठ्या लोकयुद्धाचे सेनापती होते. मृत्यूनंतरही जिवंत राहून लढण्याची प्रेरणा देणारे. आज देखील बाळासाहेबांच्या विचारातून कट्टर शिवसैनिकांना धर्म व राष्ट्रप्रेमाची प्रेरणा मिळत आहे. शिवसेनेची वाढ आणि विस्तार मुख्यतः झाला तो सत्तेत नसताना. बाळासाहेबांची दहशत आणि दबदबा दोन्ही सत्तेत नसताना अधिक होता, हे तर सिद्धच झालं आहे. बाळासाहेब जागतिक किर्तीचे महान व्यंगचित्रकार होते. देशातील व प्रमुख्याने महाराष्ट्रांतील भाजप नेत्यांचा बालिशपणा पाहिल्यास बाळासाहेबांनी अशा नेत्यांना व्यंगचित्रातून चांगलेच फटकारले असते. बाळासाहेबांनी ऐन उमेदीत कुंचल्यांचे फटकारे मारायला सुरू केले तेव्हा पंडित नेहरू, गुलझारीलाल नंदा, जगजीवनराम, चरणसिंग, स. का. पाटील, मोरारजी देसाई, इंदिरा गांधी असे लोक राजकारणात होते. जगजीवनराम, इंदिरा गांधी, मोरारजी देसाई यांच्यावर व्यंगचित्रकार म्हणून बाळासाहेबांचा विशेष लळा होता. बाळासाहेबांनी व्यंगचित्र काढणे सोडले तेव्हा ते म्हणाले, 'मी फटकारे मारावेत अशी मॉडेल्स आता राहिली नाहीत.' परंतु, आज बाळासाहेब असते तर देवेंद्र फडणवीस, बावनकुळे व चंद्रकांत पाटलांसारख्या राजकीय व्यंगात्मक नेत्यांची अवस्था अत्यंत दयनिय झाली असती. कुंचल्याच्या एका फटकाऱ्याने यांचा ढोंगीपणा उघड झाला असता. आज राजकारणात ढोंगी व कपटी नेत्यांची जणू जत्रा भरली आहे, अशावेळी साप्ताहिक 'मार्मिक' मधून 'रविवारची जत्रा' रेखाटणारे बाळासाहेब आपल्यात नाहीत, हे मनाला लागून राहिलेले दुःख आहे.

बाळासाहेबांनी ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार केला. राजकारणातील ढोंगी हिंदुत्वाचा पुरस्कार नाही केला, त्यामुळेच जाहीर सभांतून देषद्रोह्यांना देण्याची हिंमत त्यांच्यामध्ये होती. बाळासाहेबांनी हिंदुत्वाचा पुरस्कार केला तरी अन्य धर्मीयांना कमी लेखले नाही. बहुसंख्य हिंदूंच्या भावना लाथाडून देशात कुणालाच राजकारण करता येणार नाही, असे त्यांचे विचार होते. देशद्रोही खलिस्तानवादी असोत किंवा पाकधार्जिण्या मुस्लिम अतिरेकी संघटना, बाळासाहेब जाहीर सभांतून त्यांना आव्हान देत राहिले. त्यामुळे पाकिस्तानसारख्या दुष्मन राष्ट्रात बाळासाहेबांच्या नावाचा प्रचंड धसका घेण्यात आला होता. बाळासाहेब परखडपणे म्हणाले होते की, ''आमचे मुसलमानांशी वैर नाहीच. त्यांनी पाकिस्तानकडे तोंड करून बांग देऊ नये. 'वंदे मातरम्'चा आदर करावा, समान नागरी कायद्याचा आदर करावा.'' इतक्या सोप्या पद्धतीने ते मांडणी करत व लोकांत एका राष्ट्रवादी विचारांचे बीज पेरत ते पुढे जात. कोट्यावधी हिंदू आणि शिवसैनिकांचे दैवत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

**दत्ता श्रावण खंदारे, धारावी**
**९६९९३१३६२१**

---

## शेळ्या चोरणारे दोघे जेरबंद; गोंदी पोलिसांची कारवाई

### एक लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त




**जालना । प्रतिनिधी -** गोंदी पोलीस ठाणे हद्दीत साडेगाव येथुन चोरी गेलेल्या शेळ्या एका अपेरिक्षामध्ये भरुन घेवुन जात आसल्याच्या माहीतीवरून गोंदी पोलीसांनी सदर अपेरिक्षा हि साडेगाव कमानीजवळ पकडली. सदर मालवाहु अँपे रिक्षाची पाहणी केली असता त्यामध्ये तीन शेळ्या दिसल्या रिक्षातील दोन ईसमांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे नारायण पद्माकर खरात रा.साडेगाव ता. अंबड व आण्णासिंग जनार्धनसिंग पवार रा. भगवाननगर, घुंगर्डे हदगाव ता.अंबड अशी सांगीतली. सदरच्या शेळ्या व अँपे रिक्षा गोंदी पोलीसांनी जप्त केला आहे. त्यावरुन पोलीस ठाणे गोंदी येथे भागवत पाराजी घोटणकर वय ४५ वर्षे व्यवसाय शेती रा. साडेगाव ता.अंबड याच्या फिर्यादीवरुन कलम ३०३ (२), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्ह्यात आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. एकुण ५०,०००/- रुपये किमतीच्या शेळ्या चोरी गेल्या होत्या त्यापैकी ३०,०००/- रुपये किमतीच्या शेळ्या व दिड लाख रुपये किमतीची एक मालवाहु अँपे रिक्षा असा एकुण १ लाख ८० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर, फौजदार बलभिम राऊत, पोहेकॉं/ रामदास केंद्रे, पोकॉं/शाकेर सिद्धिकी, पोकॉं/सुरेश राठोड यांनी ही कारवाई केली.

---

पान १ वरुन

### जालन्यातील प्रदूषण ...

सुरु आहे. परंतु, लवकरच त्यांच्या स्वतःच्या इमारतीत हे कॉलेज जाणार असून त्यासाठी शासनाने २०० एक्कर जागा उपलब्ध करुन दिली असून निधी देखील उपलब्ध करुन दिलाय. त्यामुळे इमारत लवकरच उभा करण्याचा माणस असल्याची माहिती खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिली. येणार्या काळात आयसीटी कॉलेजचा जालन्यासाठी काय उपयोग करून घेता येईल? त्यासाठी त्यांची काय मदत होते, आमची त्यांना काय मदत होते, यावर चर्चा केली असून जालन्यासाठी काहीतरी करण्यासाठी जो काही स्कोप आहे. त्यासाठी यापुढे नक्की काम करु असेही खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटलंय. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे यांनी कॉलेजच्या विविध विभागात जावून पाहणी केली व कॉलेजचे कामकाज समजावून घेतले.

दरम्यान आयसीटी कॉलेजच्या व्यवस्थापनासोबत चर्चा करीत असतांना मोसंबीचे ज्यूस हे जास्त काळ टीकवता येत नाही. त्यामुळे त्याला चांगला भाव मिळत नाही. ज्यूस जास्त काळ टीकलं पाहिजे, मोसंबीवर प्रोसेसींग करुन काही तरी उपया योजना केल्या पाहिजेत. तसेच गहु काढल्यानंतर निघणारचा कचरा, उसाचे पाचट, पराट्याची झाडं शेतकरी जाळून टाकीत असतो, परंतु, त्याच्यावर देखील प्रक्रीया करुन त्याला उपयोगात आणलं गेलं पाहिजे यासाठी काहीतरी उपाय सुचविण्यात यावेत व त्याद्वारे शेतकऱ्यांना अधिकचे उत्पन्न मिळेल यासाठी संशोधन करावे असेही खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटलंय. त्यावर आयसीटीकडे चांगले चांगले प्रोजेक्ट असल्याची माहिती कॉलेज व्यवस्थापनाने दिली.

### आग लागल्याच्या ...

रेल्वेच्या कंट्रोल रुमकडून माहिती देण्यात आली की, कर्नाटक एक्सप्रेसबरोबर एक अपघाताची घटना घडली, ज्यामध्ये ७ ते ८ लोकांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून आपण तात्काळ रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवल्या. प्रांत अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिस अधिकारी देखील पोहचले आहेत.रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी देखील दुर्घटनेनंतर मदतकार्य करत आहेत. ते एबीपी माझाशी बोलताना दिली.

ग्रामीण रुग्णालय, खाजगी रुग्णालय आणि शासकिय वैद्यकीय महाविद्यालय या तीन रुग्णालयाकडून मदत घेतली जात आहे. त्यामध्ये सर्व रुग्णांना मदत केली जात आहे असेही प्रसाद म्हणाले. प्राथमिक माहितीनुसार, ६ ते ८ चा आकडा सांगितला जात आहे. अजून अधिकृत आकडेवारी मिळालेली नाही. सध्या आपली प्राथमिकता जखमींना उपचार देण्याची आहे, असेही आयुष प्रसाद म्हणाले.

मध्य रेल्वेचे सीपीआरओ स्वप्नील निला यांनी अपघाताबद्दल माहिती देताना सांगितले की, जळगावमध्ये लखनऊहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या दिशेने येणाऱ्या पुष्पक एक्स्प्रेसमध्ये पाचोरा स्टेशनजवळ, अलार्म चेन पुलिंगची घटना घडली. या घटनेनंतर काही प्रवासी ट्रेनमधून खाली उतरले होते. त्याच वेळी विरुद्ध दिशेने जात असलेली कर्नाटक एक्सप्रेस गाडी तेथून जात होती जिचा काही प्रवाशांना ट्रेनची धडक दिल्याची माहिती आम्हाला मिळाली.

### मंठा तालुक्यातील ...

गौतम वाव्हळ, आर्या मोरे,स्वप्निल गडदे, महेश देशमुख, बाळासाहेब घोरसड ,शुभम गुंड, समाधान शेवाळे, सतीश गुंड, हलीम कुरेशी ,विष्णू मोरे ,अनिल बोराडे, महेश बोराडे ,गोपाल बोराडे, संजय राठोड, विनोद खरात, पवन खरात ,विशाल गोडगे, सतीशराव वायाळ, महेश देशमुख ,उमेश राठोड आदींची उपस्थिती होती.

### जेथे चांगली ...

मंदिराच्या जिर्णोद्धाराचे पुण्य नवीन मंदिर निर्मितीपेक्षा जास्त आहे, असे राधाकृष्ण महाराज यांनी सांगितले. विद्यार्थ्यांशी संवादादरम्यान एका युवकाने जालना हे छोटे शहर आहे, असा विचार करून येथे कुणी मुली देत नाहीत, पुणे- मुंबईचा विचार करतात, अशी व्यथा व्यक्त केली होती. त्यावर बोलताना राधाकृष्णजी महाराज म्हणाले की, शहर लहान अथवा मोठे हे बघू नका. संस्कारयुक्त शहर आणि घराचा विचार करावा. कारण मोठ मोठ्या शहरात जाऊन मुलींना हॉटेलिंग, पर्यटन, शॉपिंगमध्ये जीवन कंठवायचे नाही तर घरात जीवन जगायचे आहे. त्यामुळे घर आणि कुटुंब संस्कारी बघावे, असा सल्ला राधाकृष्ण महाराज यांनी दिला.

यावेळी प. पू. संतोष महाराज पाचपोर यांनीही भक्तांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, कथा हा विषय करमणुकीचा नव्हे तर उद्धाराचा आहे. त्यामुळे कथा मन लावून आणि प्रेमाने ऐकली पाहिजे. यावर दहावीत नापास झाल्यानंतर आई रागावल्याने मुलाने घर सोडणे, दारी आलेल्या भिकाऱ्याला वर्णन सांगितल्यानंतर त्याने मुलाला कुठेतरी पाहिल्याचे आणि त्याला घरी आणून सोडतो, हे भिकाऱ्याचे शब्द जेवढ्या तल्लीनेतेने माता ऐकते, तशाच तल्लीतेने कथा ऐकली पाहिजे, असे ते म्हणाले. अकोला जिल्ह्यातील गोशाळा स्थापनेचा उद्देश विशद करताना ते म्हणाले की, गावातील मंडळी प. पू. डोंगरे महाराज यांच्याकडे गेली आणि आम्ही कथा करतो तरीदेखील आमचा उद्धार कसा काय होत नाही. त्यावर महाराजांनी सांगितले की, कसायाला जाणारी गाय आडवा; तुमचा उद्धार होईल आणि त्यातूनच अकोला येथे दोन गाईंवर सुरू करण्यात आलेल्या गोशाळेत आज अडीच हजारावर गोमाता आहेत.

आजच्या कथेदरम्यान राधाकृष्ण महाराजांनी सादर केलेल्या विविध भजनांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कवी केशव खटिंग यांच्या काव्यगायनाने रसिक मंत्रमुग्ध

## लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे थाटात उदघाट्न

**परतूर | प्रतिनिधी -** लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाट्न सुप्रसिद्ध कवी केशव खटिंग यांच्या हस्ते बुधवारी पार पडले.संस्थेच्या संचालिका श्रीमती वर्षाताई आकात या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या तर प्राचार्य डॉ. भारत खंदारे,मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांची यावेळी यांची उपस्थिती होती.प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त प्राचार्य डॉ. भगवानराव दिरंगे,प्रा. सखाराम टकले,साहित्यिक छबुराव भांडवलकर,एकनाथ कदम,मुख्याध्यापिका गिरी मॅडम, शिलजा मॅडम, सुरेश बहाड, आर्दड यांची उपस्थिती होती.

कवी खटिंग यांनी यावेळी एकापेक्षा एक सरस कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.




झेंडा कोणाचा धरायचा नाही. आस लागली संसाराची मनी गं... रानात राबतोय कुणबीणीचा धनी गं, लेक इतर कविता सादर त्यांनी उपस्थितांची मने जिंकली. सर्व कविताना विद्यार्थ्यांनी टाळ्याच्या कडकडाटात प्रचंड प्रतिसाद दिला. आपल्या कवितामधून त्यांनी ग्रामीण जीवन, कष्टकरी जनता, ग्रामीण बोलीभाषा, आजचे आणि पूर्वीचे जीवन यातील फरक आवर्जून सांगितला.

प्रारंभी विद्येची देवता सरस्वती, स्व. बाबासाहेब भाऊंच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. प्राचार्य बिरादार प्रास्ताविक करताना म्हणाले की, आमच्या लालबहादूर शास्त्री विद्यालयाचे स्नेहसंमेलन हे परतूरकरांसाठी आकर्षण असते. आम्ही दरवर्षी नामवंत लेखक, कवी यांना आवर्जून आमंत्रित करतो. कवी, लेखक यांना प्रत्यक्ष पाहण्याचा, ऐकण्याचा योग विद्यार्थ्यांना घडून येतो. या शिवाय विद्यालयात विविध क्रीडास्पर्धा घेतल्या जातात. सांस्कृतिक कार्यक्रमांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले जाते. सर्व स्पर्धामध्ये विद्यार्थी आवर्जून भाग घेतात. सर्व स्पर्धामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना निश्चितच वाव मिळतो.

प्राचार्य डॉ.खंदारे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती चंदा लड्डा यांनी तर पर्यवेक्षक राजकुमार राऊत यांनी आभार मानले

# वांग्याचे भाव गडगडले

## शेतकऱ्यांनी दीडशे कॅरेट वांगे फेकले बांधावर



**जालना | प्रतिनिधी -** जिल्ह्यातील वालसावंगी येथील शेतकरी संदीप पांढरे यांनी वांग्याला भाव मिळत नसल्यामुळे तब्बल दीडशे कॅरेट वांगी बांधावर फेकून दिलेत. संदीप पांढरे यांनी वीस गुंठ्यामध्ये वांग्याची लागवड केली होती. त्याच्यावर आतापर्यंत त्यांचा पन्नास हजार रुपये खर्च देखील झाला. मात्र, सध्या मार्केटमध्ये वांग्याला ७० ते ८० रुपये कॅरेट एवढाच भाव मिळतोय. त्यामुळे वांग्यावर शेतकऱ्याने केलेला खर्च देखील वसूल होत नसल्याने संकटात पडलेल्या संदीप पांढरे या शेतकऱ्याने आपले वाग्यांचे दीडशे कॅरेट बांधावरच फेकून दिले आहे.

# हिंदू स्मशानभूमीसाठी ग्रामपंचायत सेवली येथे आमरण उपोषण




**जालना | प्रतिनिधी -** हिंदु समाजासाठी सेवली ता. जालना येथे स्मशानभुमी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी वारंवार लेखी व तोंडी विनंती करुन सुध्दा प्रशासनाने हिंदू स्मशानभुमीसाठी जागा उपलब्ध करून न दिल्या मुळे आज दि. २२ बुधवार रोजी सकाळी दहा वा. पासून ग्रामपंचायत सेवली येथे अमरण उपोषण करण्यात येत आहे.

कोमलसेट कुचेरिया, माजी सरपंच व ग्रा.प. सदस्य,सचिन साकला ग्रा. प. सदस्य, गणेश मोरे, ग्रा. प. सदस्य, सतिष डुमे ग्रा.प.सदस्य,दत्ता बरडे, एकता परिषद जिल्हाध्यक्ष जालना हे उपोषणकर्ते उपोषणास बसले आहेत.

याविषयी मिळालेल्या माहीती नुसार सेवली ता. जालना येथे सर्व समाजास स्मशानभुमी उपलब्ध आहे परंतु हिंदु समाजास मात्र कसल्याही प्रकारची कोठेही गावाच्या हद्दीमध्ये स्मशानभुमी उपलब्ध नाही. ज्या लोकांना स्व:ताची शेती आहे त्या ठिकाणी ते अंत्य विधीचा कार्यक्रम अटोपतात परंतु ज्या हिन्दु नागरीकास शेती अथवा इतर मालमत्ता नाही अशांना मात्र अंत्य विधीसाठी जागा उपलब्ध नसल्याने अत्यंत त्रास होतो. वेळप्रसंगी अत्यंविधीसाठी तणाव देखील निर्माण होतो. तसेच सेवली हे संवेदनशील गाव असल्यामुळे व हिंदू स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे ईतर हिन्दु समाजाची कुचंबना होते त्यातच पावसाळयामध्ये अत्यंत बिकट अवस्था निर्माण होते. अशा परिस्थीतीत सेवली येथील हिंदु समाजासाठी समशानभुमी उपलब्ध करून देण्याची मागणी वारंवार करण्यात येत आहे.तसेच सेवली येथे १० ते १५ हजार हिंदु समाज असुन त्या साठी वेगळी स्मशान भुमी असणे अत्यंत आवश्यक आहे. सकल हिंदु समाजाने प्रशासनास स्मशानभूमी उपलब्ध करून देणे बाबत वारंवार लेखी व तोंडी विनंती केलेली आहे परंतु प्रशासनाने आज पर्यंत याची दखल घेतलेली नाही.

स्मशानभूमी चा तात्काळ तोडगा न काढल्यास यापुढे ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रागंणात अंत्यविधी करण्यात येईल याची प्रशासनाने गांभीर्याने नोंद घ्यावी. व यामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाल्यास सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असे निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थ्यांचे कालावधी वाढवण्याची मागणी

**मंठा | प्रतिनिधी -** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची राज्य पातळीवर गेल्या पाच महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी करण्यात आली आहे.या उपक्रमामुळे आपल्या राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराची संधी मिळाली आहे. या योजनेंतर्गत सर्व प्रशिक्षणार्थीची विविध विभागातील शासकीय कार्यालयांतील आस्थापनेवर प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आली आहे.

सर्व प्रशिक्षणार्थी कामावर रुजूही झाले आहेत. त्यांना ६ महिन्याच्या कालावधी संपल्यावर कालावधी मध्ये वाढ,तसेच शासकीय नौकर भर्ती मध्ये १० % जागा राखीव ठेवण्यात याव्या अश्या असायचे मागण्यांचे निवेदन मंठा तालुक्यातील मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी संघटनेच्या शिवसेनेचे उपनेते आनंदराव जाधव यांच्या कडे मागणी केली आहे.



देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेण्या अगोदरच्या दिवशी केलेल्या भाषणात लाडके भाऊ आणि लाडकी बहिणींच्या योजना आणि त्यांना दिलेली आश्वासने यांना प्राथमिकता दिली जाईल,असे आश्वासन दिले होते.

प्रशिक्षणार्थीच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. ह्या आशा निराशेत रुपांतरीत होऊ न देता प्रशिक्षणार्थी युवक युवतींना आहे त्याच आस्थापनेमध्ये कायमस्वरुपी नोकरी किंवा रोजगार उपलब्ध करून देणे आणि मिळणाऱ्या मानधनामध्ये वाढ करून द्यावी. अशी मागणी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी मंठा तालुक्याच्या वतीने आनंदराव जाधव यांना करण्यात आली आहे.

यावेळी शिवसेनेचे उपनेते आनंदराव जाधव यांनी सांगितले की राज्याचे दूरदृष्टी असलेले संवेदनशील उपख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्या सोबत प्रत्यक्ष भेटून चर्चा करून समस्यांचे निराकरण काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी तालुक्यातील सर्वच प्रशिक्षाणार्थी उपस्थित होते.निवेदनावर प्रशिक्षणार्थी गोपाल जाधव, गजानन खंदारे, चंदू बोराडे, रामदास शेंडगे, विशाल अंभुरे, सचिन अंभोरे, जिवन राठोड, उमेश पवार, शुभम देशमुख, बाबुराव हरणोल, अनिल आढे, भिमराव चव्हाण, तुकाराम शेंडगे, अविनाश राठोड, सोनिया आढे, छाया घारे, गिता शिंदे, मनीषा गायकवाड, ताई सोनवणे, वंदना राठोड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान

## जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन

**जालना | प्रतिनिधी -** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या दि.३० जानेवारीच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्याबाबत केंद्र शासनाने निर्देश जारी केले आहेत. 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियानाअंतर्गत जालना जिल्ह्यात दि.३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती कुष्ठरोग आरोग्य सेवेचे सहाय्यक संचालक डॉ. सुधाकर शेळके यांनी दिली आहे.

'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियानाअंतर्गत जालना जिल्ह्यात दि.२६ जानेवारी रोजीच्या ग्रामसभेमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कुष्ठरोग विषयक संदेश देण्यात येवून जनजागृतीपर अभियानाच्या माहितीसह जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या कुष्ठरोगाबाबतच्या आवाहनाचे वाचनही केली जाणार आहे. ग्रामसभेतच कुष्ठरोग उपचारासंबंधी माहिती देवून उपचार सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी आरोग्य केंद्र, शासकीय रुग्णालयात मोफत मिळतात याचा संदेश दिला जाणार आहे. कुष्ठरोग पंधरवाड्यात शाळेतील प्रार्थनेनंतर कुष्ठरोगाबाबतच्या प्रतिज्ञाचे वाचन करण्यात येणार आहे. सर्व शाळेतील सूचना फलकावर कुष्ठरोगाबाबत संदेश देण्यात येणार आहे. शाळेमध्ये चावडीनाटक, प्रश्नमंजूषा, निबंध स्पर्धा, कुष्ठरोगावरील गाणी, कविता वाचन, रांगोळी स्पर्धा, कटपुथली, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य व कुष्ठरोगावरील म्हणी व घोषवाक्य स्पर्धा आदि कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी तसेच कुष्ठरोग मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजनही करण्यात येणार आहे. स्थानिक महिला मंडळ, बचतगट, तरुण मंडळ यांच्या सभा घेण्यात येणार आहेत. खाजगी वैद्यकिय व्यवसायिकांच्या कार्यशाळा तसेच बाजाराच्या ठिकाणी प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात येणार आहे. याप्रमाणे विविध जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा; जालन्याची श्रद्धा वीर सर्वप्रथम

**जालना -** पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेमध्ये जीनियस स्टेप फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांनी भरघोस यश मिळून कु.श्रद्धा शरद वीर हिने सर्वप्रथम पारितोषिक पटकावले. श्रद्धा वीर हिला ५००० ची स्कॉलरशिप व प्रमाणपत्र देऊन संस्थेच्या सीईओ राजश्री पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पुणे येथे झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये राज्यातून एकूण हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यात जालन्याच्या जीनियस स्टेप फाउंडेशन च्या वतीने विविध लेवल मध्ये विद्यार्थ्यांनी भरघोस यश मिळवले. त्यामध्ये कु.स्मृति देशमुख, कु.रुजवी देशमुख, कु. कार्तिकी मुटकुळे, कु.तेजस्विनी क्षीरसागर, कु.दिव्या गुंजाळकर, अर्णव चौधरी, अनय बावस्कर, आयुष प्रधान, कु.वैभवी साबळे, राधिका लुटे, वेदांत साबळे आधी विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. त्याबद्दल संस्थेच्या संचालिका व सेन्टर च्या प्रशिक्षिका स्वाती वीर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# टेनिस क्रिकेट स्पर्धेत केसीसी बॉईज बेलघर अव्वल



**मुंबई | प्रतिनिधी -** तळा तालुका क्रिकेट असोसिएशन यांचा गुणगौरव सोहळा सन २०२३-२४ दादर श्री शिवाजी मंदिर येथे रविवारदि.१९ जानेवारी रोजी पार पडला.या गुणगौरव सोहळ्यात (मागील वर्षी सन २०२२/२३ दुसऱ्या क्रमांकावर विराजमान) के. सी.सी.बॉईज बेलघर संघ तळा तालुक्यातील अधिकृत नोंदणीनुसार एकूण ९४ संघांमध्ये टेनिस क्रिकेट स्पर्धेमधील अव्वल स्थानी उत्तुंग कामगिरी करणारा पहिला क्रमांक व शिस्तबध्द संघ असे एकाच वेळी दोन पारितोषिक पटकणारा संघ ठरला असून के.सी.सी.बॉईज बेलघर संघाचे खेळाडू प्रकाश गोळे,प्रणव कदम,यश आंबार्ले हे तळा तालुका क्रिकेट असोसिएशनच्या संघातून खेळण्यास पात्र ठरले असून सर्वोत्कृष्ट फलंदाज दिनेश खुटिकर,सर्वोत्कृष्ट गोलंदाज प्रयाग पाशिलकर,सर्वोत्तम ऑल राऊंडर भावेश कुऱ्हाडे यांची निवड करण्यात आली.तसेच एकूण ९४ अधिकृत नोंदणी संघातून प्रथम क्रमांक के.सी.सी बॉईज संघ बेलघर,द्वितीय क्रमांक यंग बॉईज संघ रहाटाड (कोळीवाडा),तृतीय क्रमांक काळभैरव क्रिकेट संघ अडनाले,चतुर्थ क्रमांक नवहिंद क्रिकेट संघ पाचघर,पाचवा क्रमांक एम एस सी क्रिकेट संघ मांदाड हे पारितोषिक पटकाविण्यात एक ते पाच क्रमांकाचे मानकरी ठरले.या कार्यक्रम निमित्ताने तळा तालुका क्रिकेट असोसिएशन चे सर्व पदाधिकारी,तळा तालुक्यातील राजकीय,सामाजिकसंघटनेतील पदाधिकारी,बेलघर/तळघर ग्रामस्थ,तळा तालुक्यातील बहुतांश क्रिकेट खेळाडू यांच्या व्यतिरिक्त अन्य मान्यवर मंडळी उपस्थित होते.तळा तालुका क्रिकेट असोसिएशन संघटना ही सामाजिक बांधिलकी जपत सर्व धर्म समभाव अश्या प्रेरणेने विविध प्रकारे कार्यक्रम राबवित असते त्यातून हा एक क्रिकेट माध्यमातून गुण गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

# राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास - दादासाहेब म्हस्के




**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी | प्रतिनिधी -** खासगाव येथे सिद्धार्थ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमदान शिबीराचा उद्घाटन समारंभ पार पडला.या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. दादासाहेब म्हस्के ,खासगाव येथिल जिल्हा परिषद सदस्य मा.संतोष पाटील लोखंडे,यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाप्रसंगी मा दादासाहेब म्हस्के म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देणे, हे आहे.महाविद्यालयाचा परीसर स्वच्छ करणे, क्रीडांगण तयार करणे, ग्रामीण भागातील रस्ते बांधने,प्रौढ शिक्षण,गलिच्छ वस्त्यांची सफाई, प्रथमोपचार,नागरी संरक्षण इत्यादी विधायक काम या उघड्यावरील कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शिकायला मिळतात.

याच कार्यक्रमा प्रसंगी खासगाव येथिल जिल्हा परिषद सदस्य मा.संतोष पाटील म्हणाले, जाफराबाद तालुक्यातील सिद्धार्थ महाविद्यालय हे विद्यार्थी घडविण्याचे केंद्र आहे.या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमदान शिबीरातून आमच्या आदर्श गावात अणखी कांही नाविण्यपूर्ण काम आम्हाला करता येईल का.महाविद्यालयीन मुलांच्या या कार्यक्रमामुळे आमच्या गावातील मुला मुलींना शिक्षणाची आवड निर्माण होईल. केंद्र शासनाने व राज्यशासने ही योजना सुरू करुण ग्रामीण भागातील समाज जिवणाशी नाळ जोडलेली आहे.आमचे गाव या सात दिवसांत महाविद्यालयाच्या वतीने ज्या बौद्धिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे त्यामुळे निश्चितच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.र.तु.देशमुख यांनीही खासगाव येथिल ग्रामस्थांनी आमच्या विद्यार्थ्यांना सहकार्य करावे असे आवाहन केले.या श्रमदान शिबीराचा निश्चितच गावाला फायदा होईल असे मत व्यक्त केले.राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, यामुळे विद्यार्थ्यांना नवचैतन्य निर्माण होते.अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपलं ध्येय साध्य करता येते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा संजय साळवे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.या श्रमदान शिबीरास संस्थेचे माजी सचिव मा.एम.डी भगत, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.शाम सर्जे, उपप्राचार्य प्रोफेसर.डॉ.सुनील मेंढे,कै.काकासाहेब देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पी.वाय.गडकरी, डॉ.के.एस. पाटील, प्रोफेसर विजय पाटील,प्रा.अनिल वैद्य, डॉ एस डी एरंडे , डॉ.सुदाम पाटील, डॉ.संतोष पाहारे,प्रा. शिवाजी वैद्य,प्रा.वाहेद पटेल, कार्यक्रमाधिकारी डॉ.रमेश उबाळे, कार्यक्रमाधिकारी प्रा.सरिता मणियार यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमास गावातील सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष गावकरी मंडळी तसेच शिबीरार्थी विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रा.से.यो. स्वयंसेविका कु. वेदिता मालोदे हिने केले, स्वागतगीत कु. पूजा कुळ हिने सादर केले.तर आभार प्रदर्शन कु. कोमल अवसारे हिने केले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

तसेच दुपारच्या सत्रात प्रा.डॉ. अनिल मगर (गट समन्वयक, रा.से.यो.) यांनी सद्िच्छा भेट देऊन स्वयंसेवकांना शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा; साधुसंताच्या विचाराने प्रगत राष्ट्राच्या उन्नतीची पायाभरणी

## माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन



**मंठा । प्रतिनिधी -** महाराष्ट्र भूमी ही साधुसंतांची भूमी असून महाराष्ट्राच्या या पावन भूमीत अनेक साधुसंतांनी जन्म घेतला त्याबरोबरच त्यांच्या विचाराने ही भूमी पावन झाली आहे. महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा लाभली असून सर्वसामान्य मानवाच्या जीवनामध्ये अमुलाग्र आणि सकारात्मक बदल घडवण्याची ताकद केवळ साधुसंत आणि वारकरी संप्रदायामध्ये आहे साधुसंताच्या विचारानेच प्रगत राष्ट्राच्या उन्नतीची पायाभरणी होते असे प्रतिपादन माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

मंठा तालुक्यातील रानमळा या गावी ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवान बाबा यांच्या प्रेरणेने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित हभप अर्जुन महाराज लाड यांच्या काल्याच्या किर्तन कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, मागील ४० वर्षापासून राजकीय जीवनामध्ये काम करत असताना मला साधुसंतांचा कायम आशीर्वाद लाभला आहे साधुसंतांच्या सानिध्यामुळे आणि त्यांच्या सेवेमुळेच मला जनसेवेचा हा वारसा कायम पुढे चालवता आला. संत संगतीमुळेच माझ्या जीवनामध्ये देखील आमुलाग्र असा बदल झाला आहे. माझे सर्व कुटुंब वारकरी संप्रदायाचा वारसा पुढे चालवणारे असून संतसंगतीमध्ये जीवनाच्या उन्नतीचा खरा मार्ग आहे असेही यावेळी लोणीकर म्हणाले. आपली संस्कृती जोपासण्यासाठी भजन कीर्तन प्रवचन यासारख्या अनेक आणि सामाजिक कार्यक्रम रानमळा येथील ग्रामस्थ कायम राबवत असतात या सर्व धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमधून नवी ऊर्जा मिळते आणि जनसेवेसाठी हीच ऊर्जा कारणीभूत ठरते त्यामुळे साधुसंतांच्या आशीर्वादाशिवाय काहीही होऊ शकत नाही अशी माझी धारणा आहे आमदार म्हणून आणि मागील काळात राज्याचा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री म्हणून मी जे काही करू शकलो ते केवळ साधू संतांच्या आशीर्वादामुळे करू शकलो असे माझे स्पष्ट मत आहे भारतीय संस्कृती जतन करण्यासाठी आयोजित या सर्व धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजाला नवी ऊर्जा मिळते आणि त्या ऊर्जेच्या बळावरच प्रत्येक व्यक्ती आपली उन्नती साधू शकतो असे देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

हभप अर्जुन महाराज लाड यांनी आपल्या अमोघ वाणीतून कीर्तनरुपी सेवा प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर यनी केलेल्या कामाचं कौतुक केलं. एकाच वेळी ३०० पेक्षा अधिक गावांना फिल्टर पाण्याची योजना परतुर विधानसभा मतदारसंघा व्यतिरिक्त महाराष्ट्रात कुठेही नाही असे मत हभप अर्जुन महाराज लाड यांनी व्यक्त केले. वारकरी संप्रदायासाठी कीर्तनासाठी आणि रानमळा येथील गावकऱ्यांसाठी आपला अमूल्य वेळ दिल्याबद्दल आमदार लोणीकरांचे महाराजांनी आभार व्यक्त केले व त्याबरोबरच ज्या सभामंडपामध्ये कीर्तन सेवा सुरू आहे हा संपूर्ण ३५ लाख रुपयांचा सभामंडप आमदार बबनराव लोणीकर यांनीच दिलेला असल्याची आठवण करून दिली त्याचबरोबर सभामंडपाच्या समोरील रिकाम्या जागेकडे निर्देश करत अजून एखादा सभामंडप या ठिकाणी देण्यात यावा असा संकेत देखील दिला.

यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर पुढील २ महिन्यात परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघातील ३०० गावांमध्ये फिल्टरचे शुद्ध पाणी सर्वांना मिळेल असे स्पष्ट केले पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की, रानमळा येथे पहिल्यांदा डांबरीकरणाचा रस्ता आपणच मंजूर करून दिला होता याची आठवण करून दिली त्याचप्रमाणे भगवान बाबा मंदिर समोर ३५ लाख रुपयांचा सभामंडप यापूर्वीच आपण दिला असल्याचे सांगत मारुती मंदिरासाठी १० लक्ष रुपयांचा सभामंडप देखील दिलेला आहे याची देखील आठवण करून दिली, गावामध्ये वॉटर ग्रीडचे शुद्ध फिल्टर पाणी सद्यस्थितीत सुरू असल्याचे सांगितले लगोलगच हभप लाड महाराज यांच्या संकेतानुसार भगवान बाबा मंदिराच्या समोरील जागेमध्ये पुढच्या वर्षभरापर्यंत २० लाख रुपयांचा सभामंडप बांधून तयार असेल असा शब्द आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी दिला. हभप अर्जुन महाराज लाड यांना आठवण करून देत नळडोह पेवा येथे आयोजित महाराजांच्या कीर्तन सेवा प्रसंगी १ कोटी रुपयांचा सभामंडप देण्याची घोषणा आपण केली होती आणि पुढील ८ दिवसात त्या सभामंडपाची तात्काळ मंजुरी आणली. त्या सभामंडपाच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी आपण महाराजांना आमंत्रित देखील केले होते परंतु त्यांच्या व्यस्त कार्यक्रमांमुळे महाराज येऊ शकले नाहीत परंतु त्या सभामंडपाच्या लोकार्पण कार्यक्रमासाठी महाराजांना यावे लागेल आणि महाराजांच्याच हस्ते त्या सभामंडपाचे लोकार्पण करू असे देखील लोणीकर यावेळी म्हणाले.

मी कायम साधुसंतांच्या सेवेसाठी तत्पर असतो, जनसेवेचा वसा आणि वारसा जपण्याचा कायम प्रयत्न करतो त्यामुळेच मला साधू संतांचा आणि भगवंताचा आशीर्वाद आहे म्हणूनच अनेक बलाढ्य शक्ती माझ्या विरोधात उभ्या असताना देखील साधुसंत भगवंत आणि लाडक्या बहिणीच्या आशीर्वादामुळे मला पुन्हा एकदा आमदार म्हणून जनसेवा करण्याची संधी मिळाली या मिळालेल्या संधीचे सोने करत मंत्री पद नसले तरी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक गावाच्या विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील होतो आहे आणि यापुढे देखील राहणार आहे अशा शब्दात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी भाजपा मंठा तालुका अध्यक्ष सतीशराव निर्वळ, जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव बोराडे, प्रसादराव गडदे माजी सरपंच रामकिसन मुसळे, दतराव कांगणे राजेभाऊ खराबे सुभाषराव बागल वसंतराव बागल बंडू नाना खरात दत्तराव बुधवंत विष्णुपंत कांगणे दिनेश पालवे पंढरीनाथ कांगणे प्रकाशराव आघाव मल्हारी पालवे दगडू टाकरस भागवत कांगणे गोविंद मुसळे रामदास मुसळे अशोक जावळे अंकुशराव कांगणे बद्रीनाथ बुधवंत मोहन गिरी ज्ञानदेव कांगणे विश्वंभर कांगणे विनायक कांगणे जगन्नाथ पालवे सुरेश शहाणे शिवाजी टाकरस हरिभाऊ बुधवंत मनोहर कांगणे विष्णू पालवे रामप्रसाद पालवे अशोक कांगणे पंढरीनाथ पालवे बाळासाहेब पालवे हरिभाऊ घुगे ज्ञानेश्वर बुधवंत अशोकराव घुगे अनिल पालवे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.